जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १०८ दिनांक - १४/०२/२०२५**

लोणी काळभोर पोलीस स्टेशन पुणे शहर

## अवैध धंद्यावर कारवाई, २१,४१०/- रुपयांचा ऐवज जप्त.

लोणी काळभोर पोलीस ठाणेस नव्याने पदभार स्विकारलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.अमितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,श्री.मनोज पाटील, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०५, डॉ.राजकुमार शिंदे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,श्रीमती अनुराधा उदमले यांचे आदेश व मार्गदर्शनाप्रमाणे लोणी काळभोर पोलीस ठाणे हद्दीतील अवैध धंद्यांवर धडक कारवाई मोहिम सुरु केली आहे.

या मोहिमे दरम्यान दि.१३/०२/२०२५ रोजी भिमनगर,वार्ड नंबर ४,थेऊर,ता.हवेली,जि.पुणे येथील इसम नामे अभिजीत दत्तात्रय गायकवाड याचे अवैध कल्याण मटका जुगाराचे धंद्यावर लोणी काळभोर पोलीस ठाणेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे व पोलीस अंमलदार यांनी छापा कारवाई केली.सदर छापा कारवाई दरम्यान अवैध धंदा चालक व मालकासह एकुण ६ इसमांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन एकुण २१,४१०/-रुपयांची रोख रक्कम व जुगाराचे साहित्य जप्त करणेत आले आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०५,डॉ.राजकुमार शिंदे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,श्रीमती अनुराधा उदमले यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक लोणीकाळभोर पो.स्टे चे श्री.राजेंद्र पन्हाळे पोलीस अमंलदार नागलोत,कुदळे,पाटील,सोनवणे,धुमाळ,गळाकाटे यांनी केले आहे.